संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# ज्ञानराज माझी माऊली सर्व भक्तांची साऊली

*जोडोनिया दोन्ही हात।*
*जगी जाणावी तो मात।*
*एकदा जा रे अलंकापुरा*
*जन्म येरझाला चुकवा।*
*आवडी सांगा जिवीचे आर्त।*
*माऊली पुरवित जाणोनि।*
*ज्ञानराज माझी माऊली।*
*एका जनार्दनाची साऊली।*

संत एकनाथांनी आळंदीचे आणि तिथल्या ज्ञानेश्वरांच्या संजिवन समाधीचे अशा आर्त शब्दामध्ये वर्णन केले आहे. आज अवघा महाराष्ट्र ज्यांना माऊली या नावाने साद घालतो त्या ज्ञानेश्वरांच्या ७१८ व्या संजीवन समाधीचा पुण्यप्रद सोहळा अलंकापुरी म्हणजेच आळंदीत साजरा होत आहे. महाराष्ट्राने अभिमानाने आपल्या अंगावर मिरवावे अशा अनेक संत अलंकारांपैकी ज्ञानेश्वर नावाचा मुकुटमणी आजही सातशे वर्षांनंतर लखलखीतपणे दिसतो आहे. ज्ञानेश्वर संत होते. तत्त्वज्ञ होते. कवी होते आणि याशिवाय ते पांडुरंगाचे खरेखुरे मानसपुत्र होते असे म्हणायला हरकत नाही. योगायोगही तसाच म्हणावा लागतो. त्यांच्या आईवडिलांचे नाव विठ्ठल आणि रुक्मिणी होते. ज्ञानेश्वर आणि चौघा भावडांना लहानपणीच मातृपितृ वियोग झाला. त्यांच्या वडील बंधूंनी म्हणजेच निवृत्तीनाथांनी आईवडिलांप्रमाणेच त्यांचा सांभाळ केला. परंतु सगळ्या सृष्टीचा पसारा सांभाळणाऱ्या त्या अनंतकोटी ब्रह्मांडनायकाने ज्ञानेश्वरांच्या रुपाने असा काही अवतार निर्माण केला की तेच ज्ञानेश्वर लाखो भगवदभक्तांचे माऊली म्हणून भक्तीच्या अमृताचा पान्हा फुलवित आहेत. महाराष्ट्राच्या भक्तीसंप्रदायाची गंगोत्री म्हणून ज्ञानेश्वरांचाच उल्लेख करावा लागेल. त्यांच्या अमृतानुभव किंवा ज्ञानेश्वरीच्यानिमित्ताने भक्तीवात्सल्याची भागिरथी या महाराष्ट्रात खळाळून वाहिली. ज्यावेळेला आपण ज्ञानेश्वरांना तत्वज्ञ म्हणतो त्यावेळेला तत्त्वज्ञ हा इतक्या सोप्या शब्दात गुढ अर्थांची उकल करू शकेल असे वाटत नाही परंतु हे सामर्थ्य ज्ञानेश्वरांमध्ये होते. भगवद्गीता संस्कृतातून प्राकृतात आणून सामान्यांना भक्तीची जी वाट दाखवली आणि तोच अनुभवामृत महाराष्ट्र प्राणपणाने जपतो आहे. ज्ञानेश्वरांना जे अनुभव आले ते त्यांनी सोप्या शब्दात सामान्यांना उपलब्ध करून दिले आणि म्हणून ते अमृत ठरले. त्या संचिताचा साक्षात्कारी सोहळा म्हणूनही ज्ञानेश्वरांच्या या अवतार कार्याकडे पाहता येईल.

### अमृताते पैजा जिंके

माझ्या मराठिची बोलु कौतुके, परि अमृतातेही पैजा जिंके। हा केवळ मराठीचा अभिमान नव्हता.तर अनुभवाने आणि परमेश्वर कृपेने त्यांना झालेला साक्षात्कार होता. साध्या हरिपाठातूनसुद्धा त्यांनी सामान्यांना पुण्याचा मार्ग दाखवला. किंबहुना निष्काम कर्मयोगाची सुरुवात कशी होऊ शकते. हे त्यांनी सहजपणाने दाखवून दिले. आज त्यांचा कोणताही ग्रंथ घेतला तरी त्यामध्ये जाणवणारे शब्दभांडार म्हणजे थेट शारदेने त्यांच्यावर केलेली असिम कृपा वाटू लागते.पण या गोष्टी केव्हा घडतात की ज्यावेळेला जिथे भगवंत आणि भक्त यांच्यात द्वैत राहात नाही. तिथेच हे शक्य होते आणि हाच अनुभव ज्ञानेश्वर माऊलींनी हरिपाठातून व्यक्त केलेला दिसून येतो.

*एकतत्व नाम, साधिती साधन।*
*द्वैताचे बंधन न बाधिजे।*
*नामामृत गोडी वैष्णवा लाधली।*
*योगिया साधली जीवनकळा।*

नामामृताच्या गोडीतून ज्ञानेश्वरांसारख्या योग्याला जीवनकळा साधली म्हणूनच ज्ञानेश्वरी काय भावार्थदीपिका काय या सगळ्या ग्रंथांचा साक्षात्कार होऊ शकला. आज त्यांच्या या भक्तीच्या पायावरच महाराष्ट्राची भक्तीपताका डोलते आहे. वारकरी संप्रदायाने ती जपून ठेवली आहे. त्यांचे हे उपकार जेव्हा एकनाथांनी आणि अनेक संतांनी आपल्या शब्दामधून व्यक्त केले त्यावेळेला त्यांना कोणी ज्ञानाबाई म्हटलेले दिसून येते, कोणी माऊली म्हटलेले पहायला मिळते तर अनाथांची माय म्हणून संतांनी आपल्या अंतरिक प्रेमाची आर्तता प्रगट केलेली दिसून येते. याचेच वर्णन करताना म्हटले गेले की,

*कैवल्याचा पुतळा प्रगटला भूतळा।*
*चैतन्याचा जिव्हाळा ज्ञानोबा माझा।*
*ज्ञानियांचा शिरोमणी वंद्य जो का पूज्यस्थानी।*
*सकळासि शिरोमणी ज्ञानोबा माझा।*

अशा या माझेपणातून माऊलीच्या प्रेमाचा पाझर व्यक्त झालेला दिसून येतो.

### शब्देविण संवाद

पंढरपुराप्रमाणेच आळंदीतही भक्तांचा मेळा भरतो आणि एकमेकांना माऊली म्हणून नमस्कारही करतो. महाराष्ट्राचे भाग्य केवढे थोर आहे. सगळ्या विश्वासाठी पसायदान मागणारा लोकोत्तर संत या भूमीमध्ये जन्माला यावा. द्वेष, मत्सर याचा लवलेष न ठेवता खळांची म्हणजेच दुष्टांची बुध्दीसुद्धा चांगली व्हावी, असे मागणे करणारा हा एकमेव महात्मा पृथ्वीतलावर पहायला मिळतो. ज्या मराठीच्या नगरीत ज्ञानदेवांनी या ब्रह्मविद्येचा सुकाळ केला, त्यावेळी या देशी भाषेच्या क्षेत्रात जणूकाही रत्नांच्या खाणी उघडून या माऊलीने आपल्या मायबोलीचे ऋण फेडले आहे, असेच वाटू लागते. आणि हे खरेच आहे की आजही त्यांची ज्ञानेश्वरी वाचतानासुध्दा लाखो भक्तांच्या श्रवणेंद्रियांना जिव्हा फुटतात आणि जिथे चातुर्यदेखिल शहाणे होते. शब्दाविण संवाद साधून इंद्रियांशिवाय एक अनुपम भोग भोगण्याचा चमत्कार त्यांच्या या ग्रंथांनी करून ठेवला आहे आणि मग अशा या ज्ञानेश्वराला एकनाथांनी साष्टांग नमस्कार करून जर प्रार्थना केली असेल, तर ती आजच्या भक्तांना आशीर्वादाचे फळ देत आहे.

*सर्व सुखाची लहरी ज्ञानाबाई अलंकापुरी।*
*शिवपीठ हे जुनाट ज्ञानाबाई तिथे मुकुट।*

असा सगळा भाव अर्पण करून ज्ञानेश्वरांविषयीची कृतज्ञता हे फार मोठे सांस्कृतिक आणि अध्यात्मिक संचित नव्या पिढीमध्ये संक्रमित झाले पाहिजे आणि महाराष्ट्राचा ज्ञानेश्वर विज्ञानेश्वरही झाला पाहिजे.